# मराठी साहित्य व मानवी मूल्ये

संपादक
डॉ. गणेशचंद्र शिंदे
डॉ. संजय जगताप
डॉ. विश्वाधार देशमुख
डॉ. संगीता घुगे

# परिकल्पना

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

© सम्पादकाधीन

प्रथम संस्करण : 2022
ISBN : 978-93-95104-09-8
मूल्य : ₹ 995

शिवानंद तिवारी द्वारा *परिकल्पना,* के-37, अजीत विहार, दिल्ली-110084 से प्रकाशित और शेष प्रकाश शुक्ल, दिल्ली से टाइप सेट होकर *काम्पैक्ट प्रिंटर्स, दिल्ली-110032 में मुद्रित*

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

13. मराठी विज्ञान कादंबरी आणि मानवी मूल्ये 109
*—डॉ. खरात लालबा विश्वनाथराव*

14. भारतीय संविधान आणि मानवी मूल्ये 113
*—डॉ. कविता चंद्रकांत लोहाळे/ताटे*

15. संत साहित्य परंपरेत व्यक्त करण्यात आलेली मानवी मूल्ये 119
*—डॉ. निलेश एकनाथराव लोंढे*

16. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून येणारी मानवी मूल्ये : एक अभ्यास 125
*—प्रा. प्रमोद भ. इंगोले*

17. संत साहित्य आणि मानवी मूल्ये 129
*—डॉ. साहेबराव भानुदासराव शिंदे*

18. आधुनिक मराठी ग्रामीण कादंबरीतील मानवी मूल्यांचे स्वरूप 133
*—प्रा. डॉ. शंकर विभुते*

19. लीळाचरित्रातील मानवी मूल्ये 141
*—डॉ. किरण प्रभाकर वाघमारे*

20. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अभंगातील मानवी मूल्ये 147
*—डॉ. दिनेशचंद्र की. राऊत*

21. संतसाहित्य आणि मानवी मूल्ये 154
*—डॉ. ज्ञानेश्वर महादराव गाडे*

22. संत चोखामेळा यांच्या अभंगांतील मानवी मूल्ये 158
*—प्रा. गणेश शिवाजी मारेवाड*

23. संत तुकारामांच्या अभंगातील मानवी मूल्ये 167
*—प्रा. डॉ. काळे बी.एम.*

24. संत तुकाराम महाराज यांच्या सामाजिक अभंगातील मुल्यविष्कार 172
*—प्रा. डॉ. मंजूषा वि. भटकर*

25. मराठी दीर्घकथा या साहित्यप्रकारातून व्यक्त होणारे मानवी मूल्ये 175
*—प्रा. पंडित मोरे*

26. संत एकनाथांच्या स्फुट ग्रंथांतील वैश्विक मानवी मूल्ये : एक अभ्यास 182
*—डॉ. शारदा विजय निवाते*

# 23. संत तुकारामांच्या अभंगातील मानवी मूल्ये

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

प्रा. डॉ. काळे बी.एम.
मराठी विभाग प्रमुख,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

जागतिक निलाकाशात तळपणाऱ्या कवीताऱ्यात संत तुकारामांचा तारा रसिकांची मने नेहमी वेधून घतो. अजरामर कवींचा जयजयकार करताना भृतहरीने रससिध्द परखडपणे मत मांडणारे जे कवी ते अजरामर कवी असे म्हटले आहे. अशा अजरामर कवीत तुकारामांचा नंबर वरचाच. संत तुकाराम अजरामर का आहेत याचा शोध जेव्हा आपण घेतो तेंव्हा लक्षात येते की, त्यांनी मांडलेला मानवी हिताचा विचार, मानवी हिताच्या आड येणाऱ्या गोष्टीवर चढवलेला हल्ला व देव, देश, धर्म यापेक्षा माणसाचा केलेला गौरव, मानवी मूल्यांची केलेली जपसणूक. त्यांच्या काळात नव्हे आजही पुरोहित व स्वतःला संत म्हणवून घेणारे मनुष्य जन्म तुच्छ आहे, अगतिक आहे असे सांगतात. त्यामुळे तुम्ही मोक्ष प्राप्तीसाठी उपासना, व्रतवैकल्ये करण्याचा सल्ला देतात. आणि त्यामाध्यमातून त्यांच शोषण केल जात. संत तुकारामांनी मनुष्य जन्माला तुच्छ मानले नाही. त्याच्या मर्यादा त्यांनी सांगितल्या. संस्काराने तो सर्वश्रेष्ठ बनेल असा विश्वास त्यांनी दाखवला.

*मोक्षपदे तुच्छ केली याकारणे।*
*आम्हा जन्म घेणे युगायुगी।*

मनुष्याचे शरीर गुणाने व्यापलेले आहे. त्याचबरोबर त्याला काही दुर्गुणही चिकटले आहेत. दुर्गुण आहेत म्हणून मनुष्य जन्मच नको या धारणेला ते विरोध करतात. मनुष्य जन्म सुंदर आहे, तो सुंदर बनविण्यासाठी त्यांने प्रयत्न केले पाहिजेत. भोगी वृत्तीचा त्याग केला पाहिजे.

*भोगे घडे त्याग। त्यागेअंगी येती भोग।*
*एसे उपराटे वर्म। धर्माअंगीचे अधर्म ॥*

मनुष्याच्या हातात काहीच नसते, जे काही होते ते ईश्वरी इच्छेने होते. अशा पलायनवादाचे त्यांनी कधी समर्थन केले नाही. जे अशा पलायनवादाचे समर्थन करतात. ते मोक्षाच्या पाठीमागे लागतात, देह त्यागाची भाषा बोलतात. परंतु संत तुकारामांचा पिंड समाजपरिवर्तकाचा होता. त्यामुळे त्यांनी 'मानवा' ची महती सांगून त्याचे जोरकसपणे समर्थन केले. ते म्हणतात.

*तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी ॥*

Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

स्वातंत्र्य' हे सर्वश्रेष्ठ मानवी मूल्य. माणसाला खऱ्या अर्थाने मनुष्यत्व देणारी गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य, ज्यांना स्वातंत्र्य जपण्यामध्ये खराखुरा रस असतो, ते माणस आपले स्वातंत्र्य निर्भयपणाने चुकत करतात. येशु खिस्त, गॅलिलियो, अब्राहम लिंकन, चार्वाक, तथागत बुद्ध, संत तुकाराम ही त्याची उदाहरणे, संत तुकारामांच्या काळात तर सर्वसामान्य माणसांवर अनेक निर्बंध धर्माच्या आडून लादली होती. त्यांच्या वैयक्तीक जीवनात धर्म ढवळाढवळा करत होता. खावे काय, प्यावे काय, उठावे कसे, बसावे कसे, निजावे कसे असल्या गोष्टीत सुद्धा धर्माचे नियम होते. संत तुकारामांनी आपल्या आयुष्यात सदैव आपल्या विवेकाला प्राधान्य दिल होत. आजूबाजूचे लोक काय म्हणतात, यापेक्षा स्वतःची बुद्धी काय सांगते हेच त्यांनी महत्वाचे मानले, स्वाधीन आणि पराधीन बुद्धीच्या बाबतीत ते म्हणतात.

*साधन तयासी साधे रे स्वाधीन बुद्धी।*
*पराधीनासी आहे घात रे थोर जाण संबंधी।*

ज्याची बुद्धी स्वाधीन असते, तो आपलं साध्य प्राप्त करतो. याऊलट जो पराधीन असतो, त्याचा मोठा घात होतो. हे त्यांचे वचन मानवी जीवनात स्वातंत्र्य या मूल्याला असलेले महत्व अधोरेखीत करते. चेर्वाकांनी ज्याप्रमाणे 'स्वातंत्र्य हाच मोक्ष' अशी घोषणा केली होती. तथागत बुद्धांनी ऐकीव माहिती, परंपरा, गुरुचा उपदेश, ग्रंथाचे कथन यापेक्षाही स्वतःच्या अनुभवाला महत्व द्याव हे त्यांनी आग्रहानं सांगितल होत. संत तुकारामांनी आपल्या एका वचनातून ही भावना अतिशय उत्तम रीतीन व्यक्त केली आहे. ते म्हणतात.

*सत्य असत्या मन केले ग्वाही।*
*मानियेले नाही बहुमता।*

हजारो वर्षाच्या परंपरा असोत की कोटयावधी लोकांची मतं असोत. ग्रंथ असोत की गुरु असोत, वृत्तवाहिन्या असोत की, इंटरनेट असो, या कोणत्याही दिशेनं येणार जे काही असेल, ते विवेकाच्या कसोटीवर छाननी करुन स्वीकारले तरच आपण आपल्या स्वातंत्र्याचे निकोप पद्धतीने रक्षण करु शकतो. माणसाला दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची सवय लागली, की तो आपल्या अंगी असलेल्या शक्तींना विसरुन जातो व स्वातंत्र्यही गमावून बसतो हे सांगताना ते म्हणतात.

*शुके नळिकेशी गोवियेले पाय।*
*विसरोनी जाय पक्ष दोन्ही।*

शुके म्हणजे पोपट. पोपटाला नळीवर बसण्याची सवय लागली की, त्याला नळी हा आपला खराखुरा आधार असल्याच वाटत. तो मानसिक दृष्टया नळीच्या आधाराने गुलाम बनतो.आकाशात उंच भरारी घेण्याची क्षमता असलेले दोन पंख आहोत हेच तो या काळात विसरुन गेलेला असतो. आत्मभान विसरलेली माणसं आपल सामर्थ्य आणि स्वातंत्र्य कस हिरावून बसतात, याच अचूक वर्णन त्यांनी या अभंगातून केले आहे.

‘समता’ हे देखील सर्वश्रेष्ठ मानवी मूल्य. ज्याठिकाणी समता नाही, त्याठिकाणी निव्वळ स्वातंत्र्य असूनही उपयोगाचे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या एका शब्दात केली आहे. ‘समता’ म्हणजे लोकशाही. संत तुकारामांच्या काळात तर धर्म, जात, वर्ण, गोत्र, कुळ, लिंग इ. गोष्टीवरुन माणसा-माणसामध्ये भेद केला जात होता. अस्पृश्यता, सोवळ आबेळ इ. गोष्टीची बजबजपुरी माजली होती. आणि हे सर्व समाजातल्या चतुर वर्गाने धर्मग्रंथाच्या अधारे लोकांच्या मनावर बिंबविल होत. आ.ह. साळुंखे यांनी म्हटल्या प्रमाणे बहुजन समाजाच्या धडावर त्यांच डोक नव्हत. माणसाच मोठेपण त्याचा जन्म कोणत्या जातीत झाला यावरुन होत होत. यासंदर्भात संत तुकाराम म्हणतात.

*यातिकुळ येथे असे अप्रमाण।*
*गुणांचे कारण अंगी असे।*

धर्म, जात, गोत्र, कुळ, ही सर्व मानवनिर्मित आहे. जन्मावरुन नव्हे तर कर्मावरुन त्या माणसाच मोठेपण मोजल जाव असे ते सांगतात. वर्णव्यवस्थेत ज्या जातीत जन्माला त्याच जातीचा व्यवसाय, परंपरा, रुढी पाळणे बंधनकारक होते. मनुष्य जीवन असहय करणारी व्यवस्था त्यांनी झुगारुन दिली.ते म्हणतात जात हे प्रमाण नसून गुण हेच प्रमाण आहे.

उच्च-निच, विटांळ, शिवाशिव, सोवळे-ओवळे या गोष्टीमुळे माणसा-माणसामध्ये जो भेद केला जातो आणि जे भेद करणारे आहे त्यांचा समाचार घेताना ते लिहतात.

*महारासी सिवे कोपे। ब्राम्हण तो नव्हे।*
*तया प्रायश्चित काही। देहत्याग करिता नाही।*
*नातळे चांडाळ। त्याचा अंतरी विटाळ।*
*ज्याचा संग चिती। तुका म्हणे तो त्या याती ॥*

वर्णव्यवस्थेत ज्या वर्गाला सर्वोच्च स्थान दिल होत. किंवा ज्यांना फक्त विदया घेण्याचा अधिकार होता अशा पुरोहित वर्गाचा रोष पत्करुन परिणामाची तमा न बाळगता समाजचिंतक तुकाराम म्हणतात, अरे ज्याला महाराला शिवल्यानंतर क्रोध येतो, तो कसला ज्ञानी. त्याचा हा घोर अपराध आहे. त्याने देहत्याग केला तरी ते, प्रायश्चित कमीच आहे असे ते सांगतात.

संत तुकारामांना समाजातील भेदाभेद दूर करावयाचा होता. हजारो वर्षापासून त्यांच्यात रुजलेले हे जातीव्यवस्थेचे संस्कार घालविणे खूप कठीण व धाडसाचे होते. त्यामुळे लोकांना प्रिय असणाऱ्या देवांनी कसा जातीभेद मानला नाही हे सांगतात.

*गौळियाची ताकपीरे। कोण पोरें चांगली।*
*येवढा त्याचा छंद देवा। कायसेवा भक्ती ते।*
*काय उपास पाडिले होते। कण्या भोवते विदुराच्या।*
*तुका म्हणे कुब्जादासी। रुपरासी हीन कळा।*

Warpudkar (ACS) College, Dist. Parbhani

Ramesh Warpudkar (ACS) College
Dist. Parbhani

प्रस्तुत अभंगात संत तुकाराम अत्यंत चतुरपणाने देवाने कसा भेदभाव मानला नाही हे सांगतात. देव गवळयाच्या मुलांबरोबर खेळतो, गोपाळकाला खातो.विदुराच्या कण्या खाल्ल्या, कुरुप असणाऱ्या कुब्जादासीवर प्रसन्न् झाला.तसेच आपणही माणसामाणसामध्ये भेद मानू नये.कोणाचाही द्वेष करु नये हेच सर्वेश्वर पूजनाचे वर्म असल्याचे सांगातात.

*कोण्याही जिवाचा न घडो मत्सर।*
*वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥*

स्वातंत्र्य, समता, बंधुता, शांती, दया, क्षमा, सत्य, अहिंसा, परोपकार ही मानवी मूल्ये संत तुकारामांनी त्याकाळातील लोकांच्या मनात रुजविली.

*परोपकार ते पुण्य।*
*परपीडा ते पाप।*

आज आपण पाहतो की, गाठीसी पुण्य, बांधण्यासाठी लोक विविध विधी करतात. दुसऱ्यांना मदत करणे, त्यांचे आश्रू पुसणे म्हणजेच 'पुण्य' आणि दुसऱ्याला त्रास देणे म्हणजे 'पाप'. संत तुकारामांनी सांगितलेली ही दोन मूल्य जरी समाजान आचरणात आणली तर समाजात शांतता नांदेल आणि समाजाची प्रगती होईल. त्यांनी ईश्वर सुद्धा माणसात पाहिला. ते म्हणतात.

*जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।*
*तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा।*

असे जनात जर्नादन पाहणारे, रंजल्या गांजलेल्या लोकांची सेवा करणाऱ्यास संत नव्हे तर देव मानणारे संत तुकाराम किती मानवतावादी होते हे आपल्या लक्षात येते.

संत तुकारामांनी मनाच्या शुद्धतेला, चित्त स्थिर ठेवण्याला खुप महत्व दिले.मनाची शुद्धाता, चित्त स्थिर ठेवणे हे देखील खुप महत्वाची मानवी मूल्ये होत ते म्हणतात.

*गेली वीरसरी। मग त्यासी रांड मारी।*
*मग नये तैसी सत्ता। गेली मागिल आणितां।*
*भंगलिया चित्ता। न ये कशाने सांधिता।*
*तुका म्हणे धीर। भंगलिया पाठी कीर।*

एखादया माणसातल पुरुषत्व संपल की, त्याची बायको त्याला मारते, त्याने पुनः कितीही प्रयत्न केला तरी पूर्वीसारखी सत्ता त्याला गाजवता येत नाही. त्याचप्रमाणे एकदा चित्त भंग पावले की, त्याला कितीही स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला तरी ते स्थिर राहत नाही. आणि चित्त स्थिर नसल्यामुळे आपल्याला यश काही संपादिता येत नाही. अशावेळी माणसाने धीर धरावा असा ते उपदेश करतातत. 'शांती' या मूल्याचे महत्व सांगतांना ते म्हणतात.

*शांतीपरते नाही सुख। येर अवघे ची दुःख।*
*म्हणऊनी शांति धरा। उतराल पैल तीरा।*

इतर प्राण्यापेक्षा माणसाला आयुष्य भरपूर लाभलेले आहे. अशा या जीवनात अनेक बीकट प्रसंग येतात. सुखाचे क्षण कमी असतात आणि दुःखाचे जास्त. अशावेळी 'शांत' पणे आपण त्याला सामोरेगेले पाहिजे. जीवनात जर यशस्वी होयचे असेल तर 'शांती' हे मूल्य अंगीकारणे त्यांना महत्त्वाचे वाटते.

माणसावर आईवडीलांचे अनंत उपकार असतात. ते जोपर्यंत तरुण असतात तोपर्यंत स्वतःच्या सुखांचा विचार न करता मुला-बाळांसाठी रात्रदिवस झटुन आपले आयुष्य खर्ची घातलेले असते. त्यामुळे आईवडीलांचा गौरव करतांना तुकाराम म्हणतात.

**सारांश** : संत तुकारामाचे अभंग हे मानवी मूल्यांनी ओतप्रोत भरलेले आहेत. त्यातुन मानवी हिताचाच विचार त्यांनी मांडला आहे. 'बुडती हे जन न देखवे डोळा। म्हणोनी येती कळवळा।' सामान्य माणसांच्या कळवळयापोटी त्यांनी ही निर्मिती केली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, दया, क्षमा, शांती, परोपकार, सर्वसामान्यांविषयी कळवळा, आईवडीलांची थोरवी, काम क्रोधावर नियंत्रण, परधन, परस्त्रीचा मोहाचा त्याग इ. यासारखी कितीतरी मानवी मूल्यांचे दर्शन त्यांच्या रचनेतून होते. शेवटी अ. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे रंजल्या-गांजलेल्यांना पोटाशी धरुन, जनात जर्नादन शोधून मानवतेची द्वाही फिरवणारे संत तुकाराम हे महाकवी होते.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani